

# महाराष्ट्र शासन

## उच्च व तंत्रशिक्षण विभाग

## भारतरत्न लता दीनानाथ मंगेशकर आंतरराष्ट्रीय संगीत महाविद्यालय, मुंबई

२ रा मजला, पु.ल. देशपांडे अकादमी, रविंद्र नाट्य मंदिर, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई - ४०००२५

Website : www.doa.maharashtra.gov.in Email: bldmasm@gmail.com

### प्रमाणपत्र अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रिया सन २०२६-२७

कला संचालनालयाच्या नियंत्रणाखाली भारतरत्न लता दीनानाथ मंगेशकर आंतरराष्ट्रीय संगीत महाविद्यालय सुरू करण्यात आले आहे. संगीत महाविद्यालयातील अभ्यासक्रमांची गुणवत्ता व उपयुक्तता उत्कृष्ट दर्जाची राखण्यासाठी शासन निर्णय क्र. एडीआर २०२२/ प्र.क्र.१२५/ तांशि-६, दि. २३ सप्टेंबर, २०२२ नुसार पुढीलप्रमाणे सल्लागार मंडळ कार्यान्वित आहे.

| नाव | पदनाम | नाव | पदनाम |
|---|---|---|---|
| श्रीमती. उषा मंगेशकर | अध्यक्ष | श्री. सुरेश वाडकर | सदस्य |
| श्री. आदिनाथ मंगेशकर | सदस्य | श्री. मयुरेश पै | समन्वयक |
| | | डॉ. किशोर इंगळे, | सदस्य सचिव, तथा संचालक, कला संचालनालय महाराष्ट्र शासन |

वरील सल्लागार मंडळाच्या मार्गदर्शनाखाली शासनाच्या मान्यतेने पुढील तक्त्यात दर्शविलेले अभ्यासक्रम सुरू करण्यात आलेले आहेत, सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षाकरिता कला संचालनालयाच्या www.doa.maharashtra.gov.in संकेतस्थळावर प्रवेश या टॅबमध्ये तसेच https://doaonline.co.in/LDMIC/ या लिंकवर दि. २१/४/२०२६ ते दि. २०/०५/२०२६ या कालावधीत प्रवेश अर्ज ऑनलाईन स्वरुपात मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | अभ्यासक्रमाचे नाव | प्रवेश क्षमता | अभ्यासक्रमाचा कालावधी | वार्षिक प्रवेश शुल्क |
|---|---|---|---|---|
| १. | हिंदुस्तानी शास्त्रीय संगीतातील प्रमाणपत्र अभ्यासक्रम | २५ | १ वर्ष | रु. ५,४००/- |
| २. | भारतीय बासरी वादन प्रमाणपत्र अभ्यासक्रम | २५ | १ वर्ष | रु. ५,४००/- |
| ३. | तबला वादन प्रमाणपत्र अभ्यासक्रम | २५ | १ वर्ष | रु. ५,४००/- |
| ४. | सतार वादन प्रमाणपत्र अभ्यासक्रम | २५ | १ वर्ष | रु. ५,४००/- |
| ५. | पियानो / किबोर्ड यामधील प्रमाणपत्र अभ्यासक्रम | २५ | १ वर्ष | रु. ५,४००/- |
| ६. | संगीत निर्मिती व ध्वनि अभियांत्रिकी प्रमाणपत्र अभ्यासक्रम | २५ | १ वर्ष | रु. ५,४००/- |
| सलील कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली शनिवार-रविवार सुरू करण्यात आलेला अभ्यासक्रम | | | | |
| ७. | भावसंगीत प्रमाणपत्र अभ्यासक्रम | ५० | ६ महिने | रु. २०,०००/- |

भावसंगीत अभ्यासक्रम कमीत कमी ३५ विद्यार्थ्यांचे प्रवेश झाल्यानंतर सुरू करण्यात येतील.

सदर अभ्यासक्रम शिकविण्यासाठी संगीत क्षेत्रातील अनुभवी व तज्ञ व्यक्तींची अध्यापनासाठी नियुक्ती करण्यात येईल, सदर अभ्यासक्रमासाठी ऑनलाईन स्वरूपात नोंदणी शुल्क / ऑडिशन शुल्क रु. १०००/- इतके राहील.

ऑनलाईन स्वरुपात प्राप्त झालेल्या अर्जामधून विद्यार्थ्यांचे ऑडिशन घेण्यात येऊन त्या आधारावर प्रमाणपत्र अभ्यासक्रमांसाठी प्रवेश देण्यात येईल.

भारतरत्न लता दीनानाथ मंगेशकर आंतरराष्ट्रीय संगीत महाविद्यालयातील प्रमाणपत्र अभ्यासक्रम तात्पुरत्या स्वरूपात पु.ल.देशपांडे अकादमी, रविंद्र नाट्य मंदिर, प्रभादेवी, मुंबई येथे जून, २०२६ पासून सुरू करण्यात येतील. प्रवेश प्रक्रिया तसेच ऑडिशनबाबत पुढील माहिती उक्त नमुद संकेतस्थळावर वेळोवेळी देण्यात येईल. त्याकरिता उमेदवाराने वेळोवेळी संकेतस्थळास भेट द्यावी.

सही /-
(श्रीमती स्मिता किंकळे)
प्र. प्राचार्य
भारतरत्न लता दीनानाथ मंगेशकर
आंतरराष्ट्रीय संगीत महाविद्यालय, मुंबई

डीजीआयपीआर/२०२६-२७/२६९

Scanned with OKEN Scanner